RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक ७६ बुधवार, जुलै १०, २०१९/आषाढ १९, शके १९४१ [redacted]

**असाधारण क्रमांक १६७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २४ मे २०१९.

### अधिसूचना

**ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६.**

क्रमांक सीपीए/आरआर/२०१८/प्र.क्र.८८/ग्रा.सं.-४.—ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ (१९८६ चा ६८) याचे कलम १० चे पोट-कलम (३), कलम १३ च्या पोट-कलम (१) चा खंड (ग), कलम १४ चे पोट-कलम (३) , कलम १६ चे पोट-कलम (२) आणि कलम ३० चे पोट-कलम (२) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीतील हे जेथवर सर्व विद्यमान नियम, अधिसूचना आणि आदेश, ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्ष व सदस्य आणि राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती, वेतन, भत्ते आणि सेवाशर्थी यांच्या संबंधित असतील तेथवर त्यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिपत्त्याखालील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्ष व सदस्य, आणि राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष व सदस्य या पदांच्या सेवाप्रवेशासाठी, पुढील नियम करीत आहे :-

१. **संक्षिप्त नाव.—**या नियमांना ग्राहक संरक्षण (राज्य आयोग आणि जिल्हा मंच यांचे अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती, वेतन, भत्ते व सेवेच्या शर्ती) नियम, २०१९ असे म्हणावे.

२. **व्याख्या.—**या नियमांमध्ये , संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ (१९८६ चा ६८) असा आहे;

(ख) " जिल्हा मंच " याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड (क) अन्वये स्थापन करण्यात आलेला जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच असा आहे;

(ग) " सदस्य " याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये नियुक्त केलेला, जिल्हा मंचाचा एक सदस्य; किंवा यथास्थिती, अधिनियमाच्या कलम १६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये नियुक्त केलेला राज्य आयोगाचा एक सदस्य, असा आहे ;

(घ) “ अध्यक्ष ” याचा अर्थ अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये नियुक्त केलेला, जिल्हा मंचाचा अध्यक्ष, किंवा यथास्थिती, कलम १६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये नियुक्त केलेला, राज्य आयोगाचा अध्यक्ष असा आहे;

(ङ) “ निवड समिती ” याचा अर्थ, कलम १० च्या पोट-कलम (१क) किंवा यथास्थिती, कलम १६ च्या पोट-कलम (१क) अन्वये घटित केलेली निवड समिती, असा आहे;

(च) “ राज्य आयोग ” याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड (ख) अन्वये स्थापन करण्यात आलेला, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग असा आहे;

(छ) “ कलम ” याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे;

(ज) या नियमांमध्ये वापरलेल्या परंतु या नियमांमध्ये व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना अधिनियमामध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

**३. जिल्हा मंचामध्ये नियुक्ती करण्याची पद्धत.—**(१) (क) जिल्हा मंचाचा अध्यक्ष, एकतर, थेट नियुक्तीद्वारे किंवा सेवेत असलेल्या जिल्हा न्यायाधीशांमधून प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्त करण्यात येईल :—

परंतु, सेवेत असलेल्या न्यायाधीशाची नियुक्ती ही उच्च न्यायालयाच्या सहमतीशिवाय करण्यात येणार नाही.

(ख) (एक) ज्याचे वय ६५ वर्षे पेक्षा जास्त नाही अशा निवृत्त जिल्हा न्यायाधीशाची,—

(क) निवड समितीने उच्च न्यायालयाने विनंती करून मिळवलेला त्याचा गोपनीय अहवाल व सेवा अभिलेख विचारात घेऊन;

(ख) त्याची सचोटी, निवाड्यांचा दर्जा व प्रकरणांच्या निपटाऱ्याबाबतचा अभिलेख विचारात घेऊन ;

पात्रतेच्या अधीनतेने नामनिर्देशन करून नियुक्ती करण्यात येईल ;

किंवा

(दोन) ज्याचे वय वर्षे ३५ पेक्षा कमी नाही आणि भारताचा नागरिक व राज्याचा अधिवासी आहे आणि ज्याच्याकडे; -

(क) स्नातक पदवी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मान्यता मिळालेल्या विद्यापीठाची कायद्याची पदवी आहे;

(ख) अधिकरणामध्ये निरंतर व्यवसाय करण्याचा किमान ७ वर्षाचा अनुभव आहे;

(ग) मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येण्याचे पुरेसे ज्ञान आहे तसेच मराठीमधून इंग्रजी भाषेत आणि इंग्रजीमधून मराठी भाषेत अनुवाद करण्याची क्षमता आहे;

(घ) संगणक उपयोजनाचे व संगणकावर काम करण्याचे उत्तम ज्ञान आहे ; -

अशा, व्यवसाय करणाऱ्या अधिवक्त्याचे नामनिर्देशन करून नियुक्ती करण्यात येईलः

परंतु, जेथे जिल्हा मंचासमोर वर्षाच्या सुरुवातीला प्रलंबित असलेल्या तक्रारी पाचशेपेक्षा अधिक नसतील किंवा मागील तीन वर्षात दाखल केलेल्या तक्रारींची सरासरी संख्या पाचशे पेक्षा अधिक नसेल आणि लगतच्या जिल्ह्याच्या जिल्हा मंचाच्या अध्यक्षाकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून या कामाचे व्यवस्थापन करता येणे शक्य आहे असे राज्य शासनाचे मत असेल त्याबाबतीत, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षांची सहमती घेऊन तसे करता येईल.

(२) उप-नियम (१) च्या तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सेवेत असणाऱ्या जिल्हा न्यायाधीशाकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून हे काम करता येणे शक्य आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर, त्यास, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींची सहमती घेऊन तसे करता येईल.

(३) जिल्हा मंचाच्या सदस्यांची पूर्णकालिक तत्त्वावर नियुक्ती करण्यात येईल.

(४) एखाद्या जिल्हा मंचापुढे वर्षाच्या सुरुवातीस प्रलंबित असलेल्या तक्रारींची संख्या एक हजार पाचेशहून अधिक असेल किंवा मागील तीन वर्षांमध्ये दाखल केलेल्या तक्रारींची सरासरी संख्या एक हजाराहून अधिक असेल त्याबाबतीत, राज्य शासनास त्या जिल्ह्यामध्ये एक अतिरिक्त जिल्हा मंच स्थापन करता येईल.

(५) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीनुसार कार्य करताना किंवा कार्य करण्याचे अभिप्रेत असताना, अध्यक्ष व सदस्य हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

४. **राज्य आयोगामध्ये नियुक्ती करण्याची पद्धत.—**(१) राज्य आयोगाच्या अध्यक्षाची नियुक्ती पूर्णकालिक तत्त्वावर करता येईल किंवा उच्च न्यायालयाच्या एखाद्या विद्यमान न्यायाधीशाकडे त्यापदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविता येईलः

परंतु, उच्च न्यायालयाच्या एखाद्या विद्यमान न्यायाधीशाची, एकतर पूर्णकालिक तत्त्वावर किंवा अतिरिक्त कार्यभार तत्त्वावर करावयाची नियुक्ती ही उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीच्या सहमतीशिवाय करण्यात येणार नाही.

(२) राज्य आयोगाचे सदस्य, एकतर थेट नियुक्तीद्वारे किंवा ते पद धारण करण्यास अर्ह असतील अशा शासकीय कर्मचाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीवर, नियुक्त करण्यात येतीलः

परंतु, सेवेत असलेल्या न्यायिक अधिकाऱ्याची उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीच्या सहमतीशिवाय नियुक्ती करण्यात येणार नाही.

(३) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीनुसार कार्य करताना किंवा कार्य करण्याचे अभिप्रेत असताना, अध्यक्ष व सदस्य हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानले जाईल.

५. **जिल्हा मंचांच्या अध्यक्षाची व सदस्यांची निवड.—**(१) जिल्हा मंचाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीसंबंधातील बाबींवर राज्य आयोगाच्या अध्यक्षाकडून प्रक्रिया करण्यात येईल.

(२) पद रिक्त होण्याच्या किमान सहा महिने अगोदर नियुक्तीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

(३) अध्यक्षाचा किंवा सदस्याचा राजीनामा किंवा मृत्यू यामुळे किंवा नवीन पद निर्माण केल्यामुळे एखादे पद रिक्त झाले असेल तर, ते पद रिक्त झाल्याच्या किंवा, यथास्थिती, निर्माण केल्याच्या नंतर लगेचच पद भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

(४) या पदांसाठी पात्र उमेदवाराकडून अर्ज मागवणारी, रिक्त पदासाठीची जाहिरात प्रमुख वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात येईल आणि राज्य आयोगाच्या अध्यक्षास उचित वाटेल अशा इतर रितीने देखील प्रसारित करण्यात येईल.

(५) जिल्हा मंचाचे अध्यक्ष व सदस्य यांची निवड ही, अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (१क) अन्वये घटित केलेल्या निवड समितीकडून करण्यात येईल.

(६) अर्ज प्राप्त करण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत मिळालेल्या अर्जांची छाननी केल्यानंतर, पात्र उमेदवारांची यादी त्यांच्या अर्जासह निवडसमितीपुढे ठेवण्यात येईल.

(७) निवडसमिती पुढील रितीने अर्जदारांची संक्षिप्त सूची तयार करील :—

(क) उमेदवारास न्यायिक पार्श्वभूमी असेल त्याबाबतीत अशा उमेदवाराने दिलेल्या न्यायनिर्णयांच्या आणि इतर न्यायिक आदेशांच्या आधारे;

(ख) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या अंतर्गत अथवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या उपक्रमांतर्गत काम करण्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, मागील दहा वर्षांच्या त्यांच्या उपलब्ध वार्षिक गोपनीय अहवालांच्या आणि त्यांनी अर्ज केलेल्या पदाशी संबंधित त्यांच्या अनुभवाच्या आधारे;

(ग) इतर बाबतीत, पुढील योजने अनुसार दोन प्रश्नपत्रिकांचा समाविष्ट असलेल्या लेखी चाचणीतील कामगिरीच्या आधारे. प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये ५० टक्के इतके अर्ह गुण असतील.

| प्रश्नपत्रिका | विषय | चाचणीचे स्वरूप | कमाल गुण | कालावधी |
|---|---|---|---|---|
| प्रश्नपत्रिका-एक | (क) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी<br>(ख) भारताच्या संविधानाबाबत ज्ञान<br>(ग) अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे ग्राहक संबंधित विविध कायद्यांचे ज्ञान | वस्तुनिष्ठ प्रकार | १०० | २ तास |
| प्रश्नपत्रिका-दोन | (क) व्यापार व वाणिज्य ग्राहक संबंधित मुद्दे किंवा सार्वजनिक बाबी यावरील मुद्द्यांमधून निवडण्यात आलेल्या विषयांवरील एक निबंध<br>(ख) विश्लेषण करण्याची क्षमता आणि आदेशाचे तर्कसंगत मसुदा लेखन यांच्या चाचणीसाठी ग्राहकाच्या प्रकरणाचा एक व्यक्तिविशिष्ट अभ्यास | वर्णनात्मक | १०० | ३ तास |

(८) निवड समिती संक्षिप्त सूचीतील सर्व उमेदवारांची मुलाखत घेईल, त्यामध्ये व्यक्तिमत्त्व, संबद्धगत अनुभव, कायद्याचे ज्ञान, विशेष कामगिरी व हाती घ्यावयाच्या कार्याबद्दलचा कल आणि दृष्टीकोन या बाबींना यथायोग्य महत्त्व देऊन, गुण देता येतील.

(९) निवड समिती, राज्य शासनाच्या विचारार्थ, गुणानुक्रमाच्या आधारे त्या उमेदवारांमधून अध्यक्ष किंवा यथास्थिती, सदस्य म्हणून नियुक्ती करण्यासाठी उमेदवारांच्या क्रमनामिकेची शिफारस करील.

(१०) राज्य शासन, शिफारस केलेल्या उमेदवारांच्या अधिकारपत्रांची आणि पूर्वचारित्र्याची पडताळणी करील किंवा पडताळणी करण्याची व्यवस्था करील.

(११) अध्यक्ष किंवा सदस्य यांची प्रत्येक नियुक्ती ही, जिल्हा शल्यचिकित्सकाने किंवा जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्याने स्वाक्षरीत केलेले स्वास्थ्य प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधीन असेल.

(१२) निवड झालेल्या अर्जदाराने अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून त्याच्या कर्तव्यांवर ज्यायोगे बाधक परिणाम होण्याची शक्यता असेल असे कोणतेही आर्थिक व इतर हितसंबंध नाहीत आणि नसतील आणि त्याचा कोणत्याही राजकीय पक्षाशी कोणताही संबंध नसेल असे हमीपत्र नियुक्तीपुर्वी सादर करणे आवश्यक असेल.

६. **निवृत्त जिल्हा न्यायाधीश प्रवर्गामधून जिल्हा मंचांच्या अध्यक्षाची नियुक्ती करणे.—**(१) राज्य आयोगास जिल्हा मंचाचा अध्यक्ष म्हणून प्रतिनियुक्तीवर काम करण्यासाठी संबंधित जिल्हा न्यायाधीशाची संमती मिळाल्यानंतर, प्रतिनियुक्तीवर बदली करून नियुक्ती करण्याच्या उद्देशाने, उच्च न्यायालयाला विद्यमान जिल्हा न्यायाधीशांच्या नावांची शिफारस करण्याकरिता विनंती करता येईल.

(२) अध्यक्ष म्हणून नियुक्त केले जाण्यासाठी निवृत्त जिल्हा न्यायाधीशाचा अर्ज मिळाल्यावर राज्य आयोग, अशा निवृत्त जिल्हा न्यायाधीशांचा गोपनीय अहवाल व सेवा अभिलेख उच्च न्यायालयाकडून मिळवील आणि ते निवड समितीपुढे ठेवील. निवड समिती त्या निवृत्त जिल्हा न्यायाधीशाला ५० गुण असलेल्या मुलाखतीकरिता बोलवील. या ५० गुणांपैकी ४५ गुण मौखिक मुलाखत देणाऱ्या उमेदवारांच्या कामगिरीसाठी विचारात घेण्यात येतील. ०५ गुण त्याचे व्यक्तिमत्व, वर्तणूक, मुलाखतीस उत्तर देतानाची वृत्ती यासाठी विचारात घेण्यात येतील. निवड समिती मुलाखतीच्या आधारे अध्यक्षाची नियुक्ती करण्यासाठी राज्य शासनाला शिफारस करता येईल. निवड समितीचा त्याबाबतचा निर्णय अंतिम असेल.

(३) अधिवक्ता प्रवर्गातून, तसेच निवृत्त न्यायाधीश प्रवर्गातून नामनिर्देशनाद्वारे करावयाची नियुक्ती ही ५० : ५० या प्रमाणात करण्यात येईल.

७. **व्यवसाय करणाऱ्या अधिवक्त्यांमधून जिल्हा मंचाच्या अध्यक्षांची नियुक्ती करण्याची कार्यपद्धती.—**(१) (क) अर्जदार अर्जासोबत पुढील बाबी दर्शविणाऱ्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करील—

(एक) जाहिरातीच्या दिनांकास असलेले त्याचे वय ;

(दोन) तो न्यायालयात करीत असलेला वकिलीचा व्यवसाय ;

(तीन) त्याने धारण केलेल्या पदव्यांबाबतची प्रमाणपत्रे ;

(चार) त्याचे नैतिक आचरण चांगले असल्याबाबत दोन मान्यवर व्यक्तींनी दिलेले प्रमाणपत्र :

परंतु, अर्जदार जिल्हा न्यायालयात व्यवसाय करीत असेल तर, असे प्रमाणपत्र जिल्हा न्यायाधीशाने दिलेले असावे आणि जर अर्जदार तालुका न्यायालयात वकिली करीत असले तर, ते दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर याने दिलेले असावे. महानगरांमध्ये व्यवसाय करणारा उमेदवार सामान्यतः तो ज्या न्यायालयात व्यवसाय करीत असेल तेथील प्रमुख न्यायाधीशाने दिलेले प्रमाणपत्र सादर करील.

(पाच) त्याला मराठी भाषा लिहीता, वाचता येण्याइतपत आणि मराठीतून इंग्रजीमध्ये व इंग्रजीतून मराठीमध्ये अनुवाद करण्याइतपत मराठीचे पुरेसे ज्ञान असल्याचे प्रमाणपत्र ;

(सहा) राष्ट्रीयत्त्व व अधिवास प्रमाणपत्र ;

(सात) त्याला संगणक उपयोजनाचे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र ;

(आठ) जर उमेदवार मागासवर्गाचा असेल तर, तो/ती आपल्या निवडीला प्राधान्य देण्यात यावे म्हणून, जात पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करील ;

(नऊ) त्याची नियुक्ती करण्यात आल्यावर, ज्यामुळे अध्यक्ष म्हणून त्याला त्याचे कर्तव्य पार पाडण्यात बाधा पोहचू शकेल असा कोणताही आर्थिक किंवा अन्य हितसंबंध त्यामध्ये असणार नाही, अशा आशयाचे दंडाधिकाऱ्यासमोर यथोचित शपथ घेतलेले शपथपत्र.

(ख) जर एखाद्या अर्जदाराच्या बाबतीत पुढे नमूद केलेल्या गोष्टी आढळून आल्या तर, अर्ज केलेल्या त्या पदाकरिता तो अपात्र असेल,-

(क) त्याला न्यायिक सेवेतून किंवा शासकीय किंवा सांविधिक अथवा स्थानिक प्राधिकरण यांच्या सेवेतून सक्तीने निवृत्त करण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल; अथवा त्याने न्यायिक सेवेतील कोणत्याही पदावरील अथवा शासनामधील, सांविधिक किंवा स्थानिक प्राधिकरणामधील परिविक्षा कालावधी पूर्ण करण्यात कसूर केली असेल; किंवा

(ख) त्याला नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल; किंवा

(ग) त्याला केंद्रीय लोकसेवा आयोग किंवा कोणताही राज्य लोकसेवा आयोग यांनी घेतलेल्या परीक्षेला बसण्यासाठी किंवा त्याची निवड होण्यासाठी कायम तत्त्वावर मनाई केली असेल; किंवा

(घ) महाराष्ट्र आणि गोवा यांची वकील परिषद आणि/किंवा भारतीय वकील परिषद यांनी कोणत्याही अवधीसाठी गैरवर्तवणूक केल्याबद्दल त्याला शिक्षा सुनावलेली असेल; किंवा

(ङ) त्याला न्यायालयाचा अवमान अधिनियम, १९७१ अन्वये दोषी ठरविण्यात आले असेल आणि शिक्षा करण्यात आली असेल; किंवा

(च) त्याच्या उमेदवारीसाठी कोणत्याही मार्गांनी नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे वशिला लावला असेल; किंवा

(छ) त्याला एकापेक्षा अधिक विवाहसाथी असतील; किंवा

(ज) त्याला दोनपेक्षा अधिक हयात अपत्ये असतील; किंवा

(झ) तो अमुक्त नादार असेल; किंवा

(ञ) तो विकल मनाचा असेल आणि सक्षम न्यायालयाने त्याला घोषित केले असेल.

(२) अध्यक्ष म्हणून, व्यवसाय करणाऱ्या अधिवक्त्याला नियुक्त करण्याचे प्रस्तावित केले असेल त्याबाबतीत निवड समिती, तिच्याकडे विचारार्थ पाठवलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या अर्जांचा विचार करील आणि तुलनात्मक गुणवत्ता व रिक्त पदे यांच्या आधारे त्यांची संक्षिप्त यादी तयार करील आणि त्यानंतर, राज्य आयोग, अध्यक्ष पदासाठी २५० गुणांची अंतिम परीक्षा घेईल. २५० गुणांपैकी २०० गुण लेखी परीक्षेसाठी असतील आणि ५० गुण तोंडी परीक्षेसाठी असतील.

(३) २०० गुणांची लेखी परीक्षा, ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ आणि नियम ५ च्या उपनियम-(७) च्या खंड (ग) मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्याखाली करण्यात आलेले नियम यांवर असेल. ज्या उमेदवारांनी लेखी परीक्षेच्या प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान ५० इतके गुण संपादन केले असतील असे उमेदवार तोंडी परीक्षेसाठी पात्र होतील. परंतु, मागासप्रवर्गातील ज्या उमेदवारांनी लेखी परीक्षेमध्ये किमान ४५ टक्के गुण मिळवलेले असतील असे उमेदवार तोंडी परीक्षेसाठी पात्र असतील.

(४) वर नमूद केल्याप्रमाणे तोंडीपरीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवाराचे नाव गुणवत्तेनुसार निवड यादीमध्ये समाविष्ट करण्यात येईल. निवड समिती, ५० गुणांची तोंडी परीक्षा घेईल. या ५० गुणांपैकी ४५ गुण मौखिक मुलाखत देणाऱ्या उमेदवारांच्या कामगिरीकरिता विचारात घेण्यात येतील. ५ गुण त्याचे व्यक्तिमत्त्व, वर्तणूक, मुलाखतीच्या वेळची वृत्ती यासाठी विचारात घेण्यात येतील.

(५) लेखी आणि तोंडी परीक्षेसाठी उमेदवाराला प्रवेश देण्याकरिता त्याची पात्रता किंवा अन्य बाबतीत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

(६) सलग, तीन प्रयत्नांमध्ये लेखी परीक्षा उत्तीर्ण होऊ न शकणारा उमेदवार परिणामी त्यानंतर अशा परीक्षेला बसण्यास अपात्र असेल. निवड समिती, उमेदवारांनी मिळवलेल्या स्पर्धात्मक गुणांच्या आधारे, नियुक्तीकरिता पात्र असणाऱ्या उमेदवारांची गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करील. यादीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या ही, परीक्षेच्या दिनांकास रिक्त असलेल्या पदांच्या संख्येइतकीच असेल.

(७) गुणवत्तायादी व्यतिरिक्त, निवड समिती, पदावधी पूर्ण होणे, वयोमर्यादा ओलांडणे इत्यादीमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य किंवा परिणामस्वरूप रिक्त पदांचा विचार करील आणि प्रतीक्षायादी तयार करील, अशा प्रतीक्षायादीमध्ये प्रतीक्षायादीसाठी निर्धारित रिक्त पदांच्या १० टक्के अधिक वा त्याहून जास्त उमेदवारांचा समावेश करता येईल.

(८) अशाप्रकारे तयार करण्यात आलेली गुणवत्ता यादी आणि प्रतीक्षायादी **शासकीय राजपत्रात** एक महिन्याच्या आत प्रसिद्ध करण्यात येईल आणि प्रतीक्षायादी अशा प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीकरिता वैध असेल.

(९) निवडसमिती, वरीलप्रमाणे निवड प्रक्रिया पूर्ण करून, राज्य शासनाला निवडलेल्या उमेदवारांच्या नावांची शिफारस करील.

(१०) राज्य शासन, त्याला सादर केलेल्या उमेदवारांच्या यादीमधून नियुक्ती करण्यापूर्वी, पूर्वचरित्रांची पडताळणी आणि वैद्यकीय तपासणी या प्रक्रिया पूर्ण करील आणि त्यानंतर नियुक्ती आदेश काढील.

(११) निवडलेले उमेदवार नियुक्ती झाल्यानंतर सुरूवातीला एक वर्षाच्या कालावधीकरिता परिवीक्षाधीन असतील.उमेदवाराची कामगिरी समाधानकारक नसल्याचे राज्य आयोगाच्या अध्यक्षास वाटले तर, परिवीक्षा कालावधी आणखी एक वर्ष वाढविता येईल.

(१२) अध्यक्ष, ग्राहक जिल्हा मंच या पदाकरिता अर्ज करणाऱ्या सर्वसाधारण प्रवर्गाच्या उमेदवारास रु. १००० इतकी आणि मागास प्रवर्गाच्या उमेदवारास रुपये ५०० इतकी अर्ज फी प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नावाने दर्शनी धनाकर्षाच्या रूपाने द्यावी लागेल.

(१३) अध्यक्ष, जिल्हा ग्राहक मंच हे सावधि नियुक्ती पद असेल. या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्ती, राज्य आयोगाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करतील.

(१४) जिल्हा मंचाच्या अध्यक्षांच्या सेवा, एका जिल्हा मंचातून दुसऱ्या जिल्हा मंचामध्ये बदलीयोग्य असतील किंवा कामाचा भार किंवा प्रलंबित प्रकरणे विचारात घेऊन राज्य आयोग ठरवील त्याप्रमाणे, दोन जिल्हा मंचांना जोडून त्यांचा उपयोग करून घेता येईल.

८. **सदस्यांची नियुक्ती करण्याची कार्यपद्धती.—**(१) जिल्हा मंचाच्या सदस्यांच्या पदावर (यापैकी एक सदस्य महिला असेल) पुढील निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात येईल :—

(एक) तो भारताचा नागरिक असेल आणि महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असेल ;

(दोन) त्याचे वय ३५ वर्षांहून कमी नसेल ;

(तीन) तो मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवीधारक असेल, तथापि, कायद्याची पदवी धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल ;

(चार) तो समर्थता, सचोटी आणि प्रतिष्ठा असणारी व्यक्ति असेल आणि कायदा, अर्थशास्त्र, वाणिज्य, लेखाशास्त्र, उद्योग, सार्वजनिक कार्य आणि प्रशासन यांच्याशी संबंधित समस्या हाताळण्यामधील पुरेसे ज्ञान व किमान १० वर्षाचा अनुभव असणारा असेल. तथापि, न्यायिकत्व बाबी हाताळण्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल ;

(पाच) त्याला मराठीतून बोलता, वाचता, लिहीता येईल आणि मराठीतून इंग्रजीमध्ये आणि इंग्रजीमधून मराठीमध्ये अनुवाद करता येईल इतपत मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल, असे ज्ञान प्रमाणित केलेले असावे ;

(सहा) त्याला संगणक उपयोजनाचे आणि संगणकावर काम करण्याचे ज्ञान असेल आणि असे ज्ञान प्रमाणित केलेले असावे.

(२) या पदांकरिता अर्ज करणारा उमेदवार अर्जासोबत पुढील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करील :—

(एक) जाहिरातीच्या दिनांकास असलेल्या वयाचा दाखला ;

(दोन) शैक्षणिक अर्हता ;

(तीन) वर्तन चांगले असल्याबाबतचे दोन मान्यवर व्यक्तींचे प्रमाणपत्र. यापैकी एक प्रमाणपत्र हे, उमेदवाराला जेथे अर्थशास्त्र, कायदा, लेखाशास्त्र, वाणिज्य, उद्योग, प्रशासन व सार्वजनिक कार्य यांच्याशी संबंधित समस्या हाताळण्याचा १० वर्षांचा अनुभव आहे. अशा क्षेत्रातील विभाग प्रमुखाचे असावे ;

(चार) त्याला मराठीतून बोलता, वाचता, लिहिता येईल आणि मराठीतून इंग्रजीमध्ये आणि इंग्रजीमधून मराठीमध्ये अनुवाद करता येईल इतपत मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र ;

(पाच) राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र ;

(सहा) त्याला संगणक उपयोजनाचे ज्ञान असल्याचे दर्शविणारे प्रमाणपत्र ;

(सात) उमेदवार मागासवर्गीय असेल तर, त्यास निवडीमध्ये प्राधान्य देण्यात यावे म्हणून जात पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र ;

(आठ) त्याची नियुक्ती करण्यात आल्यावर ज्यामुळे सदस्य म्हणून त्याला त्याचे कर्तव्य पार पाडण्यात बाधा पोहोचवणारा कोणताही आर्थिक किंवा इतर हितसंबंध असणार नाही अशा आशयाचे दंडाधिकाऱ्यासमोर यथोचितरीत्या शपश घेतलेले शपथपत्र.

(३) जर एखाद्या उमेदवाराच्या बाबतीत पुढे नमूद केलेल्या गोष्टी आढळून आल्या तर, तो या पदावर नियुक्त केला जाण्यास पात्र असणार नाही :—

(एक) त्याला शासकीय किंवा सांविधानिक अथवा स्थानिक प्राधिकरण यामधील सेवेतून किंवा कोणत्याही नियोक्त्याकडून सक्तीने सेवानिवृत्त केले असेल, पदावरुन दूर केले असेल किंवा बडतर्फ केले असेल तर, किंवा शासकीय, सांविधिक किंवा स्थानिक प्राधिकरण यामधील अथवा अन्य कोणताही नियोक्त्याकडील सेवेतील कोणत्याही पदावरील परिवीक्षा कालावधी पूर्ण करण्यात कसूर केली असेल ; किंवा

(दोन) त्याला नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधासाठी दोषी ठरविलेले असेल ; किंवा

(तीन) त्याला केंद्रीय लोकसेवा आयोगाने किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेला बसण्यासाठी किंवा त्याच्या निवडीसाठी कायम तत्त्वावर मनाई केली असेल ; किंवा

(चार) महाराष्ट्र आणि गोवा यांच्या वकील परिषदेने किंवा भारतीय वकील परिषदेने त्याला गैरवर्तणूक केल्याबद्दल कोणत्याही अवधीसाठी शिक्षा दिली असेल ; किंवा

(पाच) न्यायालयाचा अवमान अधिनियम, १९७१ अन्वये त्याला दोषी ठरविण्यात आले असेल आणि शिक्षा करण्यात आली असेल ; किंवा

(सहा) त्याने आपल्या उमेदवारीसाठी कोणत्याही मार्गांनी नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे वशिला लावला असेल ; किंवा

(सात) त्याला एकापेक्षा अधिक हयात विवाहसाथी असतील ; किंवा

(आठ) त्याला दोनपेक्षा अधिक हयात अपत्ये असतील ; किंवा

(नऊ) तो अमुक्त नादार असेल ; किंवा

(दहा) तो विकल मनाचा असेल आणि सक्षम न्यायालयाने त्याला तसे घोषित केले असेल.

(४) अर्ज मिळण्याच्या दिनांकाच्या संबंधात विनिर्दिष्ट केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत मिळालेल्या अर्जांची छानणी केल्यानंतर, पात्र उमेदवारांची त्यांच्या अर्जांसह यादी निवड समितीसमोर ठेवण्यात येईल.

(५) निवड समिती, तिच्याकडे विचारार्थ पाठविलेल्या, पात्र उमेदवारांच्या सर्व अर्जांचा विचार करील, आणि उमेदवारांच्या संख्येनुसार अर्जांचा विचार करून तुलनात्मक गुणवत्तेच्या आधारे त्यांची संक्षिप्त यादी तयार करील आणि त्यानंतर, राज्य आयोग, सदस्यांच्या पदासाठी २५० गुणांची अंतिम परीक्षा घेईल. या २५० गुणांपैकी २०० गुण लेखी परीक्षेसाठी असतील आणि ५० गुण मौखिक परीक्षेसाठी असतील.

(६) २०० गुणांची लेखी परीक्षा ही, ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ व नियम ५ चा उप-नियम (७) चा खंड (ग) मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्याखाली केलेले नियम यावर आधारित असेल. लेखी परीक्षेमध्ये प्रत्येक विषयात किमान ५० गुण मिळविणारे उमेदवार मौखिक परीक्षेसाठी पात्र असतील :

परंतु, मागास प्रवर्गातील जे उमेदवार लेखी परीक्षेमध्ये किमान ४५ गुण मिळवतील ते मौखिक परीक्षेसाठी पात्र असतील.

(७) मौखिक परीक्षा ५० गुणांची असेल, या ५० गुणांपैकी ४५ गुण हे, तोंडी मुलाखत देणाऱ्या उमेदवारांच्या कामगिरीकरिता विचारात घेण्यात येतील. ५ गुण हे, मुलाखत देतेवेळी त्याचे व्यक्तिमत्त्व, वर्तणूक, वृत्ती यांकरिता विचारात घेण्यात येतील.

(८) लेखी परीक्षेसाठी आणि मौखिक परीक्षेसाठी प्रवेश देण्याकरिता उमेदवाराची पात्रता किंवा अन्य बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम असेल.

(९) लागोपाठच्या तीन प्रयत्नांमध्ये लेखी परीक्षा उत्तीर्ण न होऊ शकलेल्या उमेदवारांना त्यानंतर त्या परीक्षेला बसण्यास निरर्ह ठरवण्यात येईल. निवड समिती, उमेदवारांनी मिळवलेल्या स्पर्धात्मक गुणांच्या आधारे, नियुक्तीकरिता पात्र असलेल्या उमेदवारांची यादी गुणवत्तेनुसार तयार करील. यादीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या ही, परीक्षेच्या दिनांकास रिक्त असलेल्या पदांच्या संख्येइतकी असेल.

(१०) गुणवत्ता यादीव्यतिरिक्त, निवड समिती ही पदावधी पूर्ण होणे, वयोमर्यादा ओलांडणे, इत्यादींमुळे निर्माण झालेली संभाव्य किंवा परिणामस्वरुप रिक्त पदे विचारात घेऊन एक प्रतीक्षा यादी तयार करील. अशा प्रतीक्षा यादीमध्ये, प्रतीक्षा यादीकरिता निर्धारित १० टक्के किंवा त्याहून अधिक उमेदवारांच्या संख्येचा समावेश करता येईल.

(११) तयार करण्यात आलेली गुणवत्ता यादी व प्रतीक्षा यादी शासकीय **राजपत्रात** एका महिन्याच्या आत प्रसिद्ध करण्यात येतील आणि प्रतीक्षायादी, अशा प्रसिद्धीच्या दिनांकापासून केवळ एका वर्षाच्या कालावधीसाठी वैध असेल.

(१२) निवड समिती, वरीलप्रमाणे निवड प्रक्रीया पूर्ण करून, राज्य शासनाला निवडलेल्या उमेदवारांच्या नावांची शिफारस करील.

(१३) राज्य शासन त्याच्याकडे सादर करण्यात आलेल्या उमेदवारांच्या यादीमधून नियुक्ती करण्यापूर्वी, पूर्वचारित्र्याची पडताळणी व वैद्यकीय तपासणी यांची प्रक्रिया पूर्ण करील आणि त्यानंतर, नियुक्ती आदेश काढील.

(१४) निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती सुरुवातीला एक वर्षाच्या कालावधीकरिता परिवीक्षाधीन असेल. उमेदवाराची कामगिरी समाधानकारक नाही असे राज्य आयोगाच्या अध्यक्षाचे मत झाल्यास, परिवीक्षाधीन कालावधी आणखी एक वर्षाकरिता वाढविता येईल.

(१५) जिल्हा मंचाच्या सदस्य पदाकरिता अर्ज करणाऱ्या सर्वसाधारण प्रवर्गाच्या उमेदवारास रुपये ५०० इतकी आणि मागास प्रवर्गाच्या उमेदवारास रुपये २५० इतकी अर्ज फी, प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नावाने काढलेल्या दर्शनी धनाकर्षाच्या रुपाने द्यावी लागेल.

(१६) जिल्हा ग्राहक मंचाचे सदस्य यांचे पद सावधि-नियुक्ती पद असेल. नियुक्त केलेल्या व्यक्ती, राज्य आयोगाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करतील.

(१७) जिल्हा ग्राहक मंचाचे सदस्य यांच्या सेवा एका जिल्हा मंचातून दुसऱ्या जिल्हा मंचामध्ये बदलीयोग्य असतील किंवा कामाचा भार अथवा प्रलंबित प्रकरणे विचारात घेऊन राज्य आयोग ठरवील त्या प्रमाणे दोन जिल्हा मंचांना जोडून त्याचा उपयोग करून घेता येईल.

(१८) अध्यक्ष आणि सदस्य यांची नियुक्ती करण्याच्या वेळी, नियमामध्ये नमूद केल्याप्रमाणे निवड प्रक्रियेतून जावे लागलेल्या संबंधित उमेदवारांची, जिल्हा मंचाचे अध्यक्ष व सदस्य म्हणून पुनर्नियुक्ती करण्याच्या बाबतीत उक्त उमेदवारांना त्याच निवड प्रक्रियेतून जाण्याची आवश्यकता असणार नाही. तथापि, जर अध्यक्ष व सदस्य यांनी अर्हतांची पुर्तता केली असेल तर, निवड समितीच्या शिफारशींवरुन, त्यांची पुनर्नियुक्ती करण्यात येईल. शिफारस करताना निवड समिती, गोपनीय अहवाल, प्रकरणे निकालात काढणे, पहिल्या नियुक्तीच्या वेळेची कामगिरी, उमेदवारांच्या सर्वसाधारण नावलौकीक आणि उमेदवारांच्या विरोधात प्रलंबित असलेल्या कोणत्याही तक्रारी, यांचा विचार करील.

(१९) जिल्हा मंचाच्या अध्यक्षाचे पद हे राजीनामा किंवा पदावरुन दूर करणे यामुळे रिक्त झाले असेल, किंवा अनुपस्थिती, आजारपण यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे तो कार्य पार पाडण्यासाठी अक्षम असेल त्याबाबतीत, त्यावेळी पद धारण करत असलेला, जिल्हा मंचाचा सर्वात ज्येष्ठ (नियुक्तीच्या क्रमाने) सदस्य हा जो, कलम १० च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंचाचे अध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यासाठी अर्ह असेल असा, असे रिक्त पद भरण्यासाठी नियुक्त केलीली व्यक्ती जिल्हा मंचाच्या अध्यक्षाचे पद ग्रहण करेपर्यंत, अध्यक्षाची कार्ये पार पाडील. जिल्हा मंचाच्या दोन्ही सदस्यांच्या अनुपस्थितीमध्ये, किंवा अध्यक्षाचे पद धारण करण्यासाठी कोणताही सदस्य अर्ह नसेल तर अध्यक्ष हा किंवा, अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यासाठी अर्ह असलेला, लगतच्या जिल्ह्यातील जिल्हा मंचाचा कोणताही ज्येष्ठतम (नियुक्तीच्या क्रमानुसार) सदस्य हा, त्या जिल्हा मंचाच्या अध्यक्षाची कार्ये पार पाडील :

परंतु, जर लगतच्या कोणत्याही जिल्ह्याच्या, जिल्हा मंचाचा सदस्य, अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यास पात्र असेल तर, अशा लगतच्या जिल्ह्याच्या अध्यक्षापेक्षा त्या सदस्यास अधिक प्राधान्य देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, शासन, असा जिल्हा, आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील : अशा प्रयोजनांसाठी ज्याला लगतचा जिल्हा म्हणून समजण्यात येईल :

परंतु, तसेच त्या जिल्हात एकापेक्षा अधिक मंच असतील त्याबाबतीत, त्या जिल्ह्यातील दुसऱ्या कोणत्याही मंचाचा अध्यक्ष किंवा, अध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास पात्र असलेला जिल्ह्यातील दुसऱ्या कोणत्याही मंचाचा कोणताही सदस्य त्या अध्यक्षाची कार्ये पार पाडील ;

**स्पष्टीकरण :—**जर सदस्य, अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये पात्र नसतील तर, असे सदस्य, तक्रारीच्या सुनावणीच्या तारखा देणे, अर्ज, तक्रारी, इत्यादी स्वीकारणे यांसारखी मंचाची, कामे पार पाडतील आणि ती बाब अध्यक्षाच्या निदर्शनास आणतील, असे प्रत्येक काम नियुक्तीकार्य असल्याचे मानण्यात येईल. तथापि, ते तक्रारींची सुनावणी करणार नाहीत व त्या तक्रारी निकालात काढणार नाहीत.

(२०) अशी कामे पार पाडण्यामध्ये सदस्यांना सहाय्य करणे हे, प्रबंधकाचे आणि कर्मचाऱ्यांचे कर्तव्य असेल.

(२१) अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होणारा अध्यक्ष किंवा कोणताही सदस्य, ज्या दिनांकास तो असे पद धारण करण्याचे बंद होईल त्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधीसाठी, जी त्याच्या पदावधीमध्ये, अधिनियमान्वये कोणत्याही कार्यवाहीची विषयवस्तू असेल, अशा संघटनेच्या व्यवस्थापनामध्ये किंवा प्रशासनामध्ये कोणतीही नियुक्ती धारण करणार नाही किंवा त्याच्याशी संबंधित असणार नाही.

(२२) जिल्हा मंचाचा अध्यक्ष न्यायिक कार्ये पार पाडील, तर जिल्हा मंचाचा प्रबंधक हा, प्रशासकीय कार्ये पार पाडील.

९. **राज्य आयोगाच्या अध्यक्षाची निवड.—**(१) राज्य शासनाकडुन नियुक्तीची प्रक्रिया, रिक्त पद निर्माण होण्याच्या किमान सहा महिने अगोदर सुरू करण्यात येईल.

(२) अध्यक्षाचा राजीनामा किंवा मृत्यू किंवा नवीन पदाची निर्मिती या कारणांमुळे पद रिक्त झाले असेल तर, ते पद भरण्यासाठीची प्रक्रिया, ते पद रिक्त झाल्यानंतर किंवा, यथास्थिती, निर्माण झाल्यानंतर, तात्काळ सुरू करण्यात येईल.

(३) अधिनियमाच्या कलम १६ च्या पोट-कलम (१क) अन्वये घटित केलेली निवड समिती, प्रतीक्षा यादीवर असलेल्या एखाद्या उमेदवाराची आणखी एका उमेदवारासह, गुणवत्ता आणि अनुभव यांच्या आधारे योग्यता निर्धारित करून शोध आणि निवड प्रक्रियेमार्फत, राज्य शासनाच्या विचारार्थ त्यांची शिफारस करील.

(४) विचाराधीन उमेदवारांस दक्षतेच्या दृष्टीकोनातून मुक्त करण्यात येईल.

(५) राज्य शासन, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय केल्यानंतर, निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती करील.

(६) अध्यक्षाची प्रत्येक नियुक्ती, जिल्हा शल्यचिकित्सकाने किंवा जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्याने स्वाक्षरित केलेले शारीरिक स्वास्थ्य प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधीन करण्यात येईल.

(७) नियुक्तीपूर्वी, निवड झालेल्या उमेदवारास, अध्यक्ष म्हणून त्याच्या कार्यावर बाधक परिणाम होण्याचा संभव असेल असा त्याचा कोणताही वित्तीय किंवा इतर हितसंबंध राहणार नाही किंवा असणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र सादर करावे लागेल.

(८) राज्य आयोगाचा अध्यक्ष किंवा कोणताही इतर सदस्य याच्या राजीनाम्यामुळे आणि त्यांना पदावरुन दूर केल्यामुळे किंवा अन्यथा रिक्त झालेले प्रत्येक पद, नवीन नियुक्तीद्वारे भरण्यात येईल.

(९) असे पद धारण केल्याचे बंद केलेला अध्यक्ष, ज्या दिनांकास असे पद धारण करण्याचे बंद होईल त्या दिनांकापासुन पाच वर्षांच्या कालावधीसाठी, त्याच्या पदावधीमध्ये जी, अधिनियमान्वये कोणत्याही कार्यवाहीची विषयवस्तू असेल अशा संघटनेच्या व्यवस्थापनामध्ये किंवा प्रशासनामध्ये कोणतीही नियुक्ती धारण करणार नाही, किंवा ती त्याच्याशी संबंधित असणार नाही.

(१०) राज्य आयोगाचा अध्यक्ष पाच वर्षांच्या कालावधीकरिता किंवा वयाची सदुसष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तेथपर्यंत, पद धारण करील आणि तो पुनर्नियुक्तीसाठी पात्र असणार नाही :

परंतु, अध्यक्षास,–

(क) कोणत्याही वेळी राज्यशासनाला उद्देशून स्वतःच्या स्वाक्षरीनिशी आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल.

(ख) त्यास पदावरुन दूर करता येईल.

१०. **राज्य आयोगाच्या सदस्याची निवड.—**(१) राज्य आयोगाच्या अध्यक्षाकडून नियुक्तीची प्रक्रिया, रिक्त पद निर्माण होण्याच्या किमान सहा महिने अगोदर सुरु करण्यात येईल.

(२) सदस्याचा राजीनामा किंवा मृत्यू किंवा नवीन पदाची निर्मिती या कारणामुळे पद रिक्त झाले असेल तर, पद भरण्यासाठीची प्रक्रिया ते पद रिक्त झाल्यानंतर किंवा, यथास्थिती, ते निर्माण झाल्यानंतर, तात्काळ सुरू करण्यात येईल.

(३) पात्र उमेदवाराकडून पदांकरिता अर्ज मागविण्यासाठीची, रिक्त पदाची जाहिरात प्रमुख वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्यात येईल आणि तसेच, ती राज्य आयोगाच्या अध्यक्षास उचित वाटेल अशा इतर कोणत्याही रीतीने प्रसारित करण्यात येईल.

(४) राज्य आयोगाच्या सदस्यांची निवड, अधिनियमाच्या कलम १६ च्या पोट-कलम (१क) अन्वये घटित केलेल्या निवड समितीकडून करण्यात येईल.

(५) अर्ज प्राप्त होण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत, प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी केल्यानंतर, पात्र उमेदवारांची यादी त्यांच्या अर्जासह निवड समिती समोर ठेवण्यात येईल.

(६) निवड समिती पुढील रीतीने अर्जांची संक्षिप्त यादी तयार करील :—

(क) न्यायिक पार्श्वभूमी असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत, अशा उमेदवाराने दिलेले न्यायनिर्णय आणि इतर न्यायिक आदेश यांच्या आधारे;

(ख) केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य शासन अथवा केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांच्या अंतर्गत असलेले उपक्रम यांमध्ये काम करण्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, मागील दहा वर्षांच्या, उपलब्ध असलेल्या त्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालांच्या आणि ज्या पदाकरिता अर्ज केलेला आहे त्यासंबंधीच्या त्यांच्या अनुभवाच्या आधारे निवडसमिती, राज्य शासनाच्या विचारार्थ, पुढील क्षेत्रांचा समावेश असलेल्या मौखिक परीक्षेच्या आधारे, गुणानुक्रमे उमेदवारांमधून सदस्य म्हणून नियुक्ती करण्यासाठी उमेदवारांच्या नावांच्या नामिकेची शिफारस करील.

| अनुक्रमांक | क्षेत्रे |
|---|---|
| १. | (क) सामान्य ज्ञान, चालु घडामोडी, इत्यादी. |
| | (ख) दिवाणी प्रक्रिया संहितेची ठळक वैशिष्ट्ये. |
| | (ग) अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे, ग्राहकविषयक विविध कायद्यांचे ज्ञान. |
| | (घ) भारताच्या संविधानाचे ज्ञान. |
| | (ङ) व्यापार व वाणिज्यविषयक मुद्दे, ग्राहक संबंधित मुद्दे किंवा सार्वजनिक कार्य आणि गाऱ्हाणी संबंधित मुद्दे. |
| | (च) विश्लेषण करण्याची क्षमता आणि आदेशांचे वादातीत (वैधानिक) मसुदालेखन आजमावण्यासाठी ग्राहक प्रकरणाचा एक व्यक्तीवृत्त अभ्यास. |

(७) निवड समिती, संक्षिप्त सूचीतील सर्व उमेदवारांची मुलाखत घेईल आणि व्यक्तिमत्व, त्यासंबंधातील मागील अनुभव, न्यायनिर्णयाचा दर्जा, कायद्याचे ज्ञान, त्याला नेमून दिलेली कामे पार पाडण्यातील विशेष कामगीरी क्षमता आणि दृष्टीकोन यांचे योग्य गुणांकन करून गुण देईल.

(८) निवड समिती, ५० गुणांची मौखिक परीक्षा घेईल. या ५० गुणांपैकी, ४५ गुण हे तोंडी मुलाखत देणाऱ्या उमेदवारांच्या कामगीरीकरिता विचारात घेण्यात येतील आणि ५ गुण हे त्याचे व्यक्तिमत्व, वर्तणूक, मुलाखत देतेवेळीची वृत्ती याकरिता विचारात घेण्यात येतील.

(९) निवड समिती, राज्य शासनाच्या विचारार्थ, गुणानुक्रमे उमेदवारांमधून सदस्य म्हणून नियुक्त करण्यासाठी उमेदवारांची नावे असलेल्या नामिकेची शिफारस करील.

(१०) राज्य शासन, शिफारस केलेल्या उमेदवारांची शिफारस पत्रे आणि पूर्वचरित्र याची पडताळणी करील किंवा पडताळणी करण्याची व्यवस्था करील.

(११) सदस्याची प्रत्येक नियुक्ती, त्याच्या वैद्यकीय स्वास्थ्याविषयी जिल्हा शल्यचिकित्सक किंवा जिल्हा स्वास्थ्य अधिकारी यांनी स्वाक्षरित करून दिलेले शारीरिक स्वास्थ्य प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधीन असेल.

(१२) नियुक्ती पूर्वी, निवड झालेला उमेदवाराचा, सदस्य म्हणून त्याच्या कार्यांवर बाधक परिणाम होण्याचा संभव असेल असा कोणताही वित्तीय किंवा इतर हितसंबंध नाही किंवा असणार नाही आणि त्याचे कोणतेही राजकीय संबंध असणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र त्याने सादर केलेले असेल.

(१३) निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती झाल्यावर, सुरूवातीला तो एक वर्षाच्या कालावधीकरिता परिविक्षाधीन असेल. उमेदवाराची कामगीरी समाधानकारक नाही असे राज्य आयोगाच्या अध्यक्षाचे मत झाल्यास, परिविक्षाधीन कालावधी वाढविता येईल.

(१४) राज्य आयोगाचा कोणत्याही इतर सदस्याच्या राजीनाम्यामुळे किंवा त्याला पदावरून दूर केल्यामुळे अथवा अन्यथा कोणत्याही कारणामुळे रिक्त झालेले प्रत्येक पद नवीन नियुक्तीद्वारे भरण्यात येईल.

(१५) राज्य आयोगाच्या अध्यक्षाचे पद राजीनामा, पदावरून दूर करणे यामुळे किंवा अनुपस्थिती, आजारपण किंवा इतर कोणत्याही कारणाने तो कार्ये पार पाडण्यास असमर्थ ठरल्यामुळे असे कोणतेही पद रिक्त झाले असेल त्याबाबतीत त्यावेळी पद धारण करणारा राज्य आयोगाचा

वरिष्ठतम सदस्य (नियुक्तीच्या क्रमाने) हा असे रिक्त पद भरण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीने राज्य आयोगाच्या अध्यक्षाचे पद धारण करेपर्यंत हंगामी अध्यक्ष असेल. तथापि, असा हंगामी अध्यक्ष आणि इतर सदस्य विवादास्पद प्रकरणांवर सुनावणी करणार नाहीत आणि निर्णय देणार नाहीत. ते एकतर्फी प्रकरणे निकालात काढू शकतील आणि सुनावणीकरीता पुढील तारखा देऊ शकतील. तथापि, एकतर्फी प्रकरणांत, अशा हंगामी अध्यक्षाचे आणि सदस्याचे मत सर्वसंमत असले पाहिजे.

(१६) सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद झालेला कोणताही सदस्य, ज्या दिनांकास असे पद धारण करण्याचे बंद होईल त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी जी त्याच्या पदावधीमध्ये, अधिनियमान्वये कोणत्याही कार्यवाहीची विषयवस्तु असेल अशा संघटेनच्या व्यवस्थापनामध्ये किंवा प्रशासनामध्ये कोणतीही नियुक्ती धारण करणार नाही किंवा त्याच्याशी संबंधित राहणार नाही.

(१७) राज्य आयोगाचे सदस्य, पाच वर्षांच्या कालावधीकरिता किंवा वयाची सदुसष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पद धारण करतील आणि ते पुनर्नियुक्तीसाठी पात्र असणार नाहीत :

परंतु सदस्यांस :—

(क) कोणत्याही वेळी राज्य शासनाला उद्देशून आपल्या पदाचा स्वाक्षरीनिशी लेखी राजीनामा देता येईल ; किंवा

(ख) त्यास पदावरून दूर करता येईल.

११. **जिल्हा मंचाच्या पूर्ण-वेळ अध्यक्षाचे व सदस्यांचे वेतन/पारिश्रमिक.—**(१) प्रतिनियुक्तीवर नियुक्ती केलेला कोणाताही न्यायाधीश हा अधिकालिक वेतनामानामध्ये जिल्हा न्यायाधिशाचे वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असेल.

(२) निवृत्त जिल्हा न्यायाधिशामधून निवडीनंतर नियुक्त करण्यात आलेल्या अध्यक्षास, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ याच्या नियम १५७ च्या उप-नियम (२) नुसार निश्चित केलेले त्याचे वेतन मिळेल.

(३) प्रतिनियुक्तीवरील सेवारत अध्यक्ष वगळता पूर्णवेळ अध्यक्षास, एकावन्न हजार पाचशे पन्नास रुपये इतके निश्चित एकत्रित पारिश्रमिक किंवा वेळोवेळी राज्य शासनाने विहित केलेले पारिश्रमिक अधिक वेळोवेळी राज्य शासनाच्या गट-अ अधिकाऱ्याला अनुज्ञेय असेल त्या दराने इतर भत्ते मिळतील.

(४) पूर्णवेळ सदस्याला सर्व मिळून रुपये चाळीस हजार इतके एकत्रित पारिश्रमिक देण्यात येईल.

(५) अतिकालिक तत्त्वावर अध्यक्ष किंवा सदस्य पदावर नियुक्त केलेल्या (अवर सचिव किंवा त्यास समकक्ष असणाऱ्या पदावरील) सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती, पुनर्नियुक्ती केलेल्या सेवानिवृत्तीधारकाला देय असलेले निवृत्ती वेतन अधिक इतर भत्ते इतकी रक्कम वजात करून आहरित करण्यात आलेल्या शेवटच्या वेतनाच्या आधारे करण्यात येईल.

(६) जिल्हा मंचाचा अध्यक्ष व सदस्य हे शासकीय दौऱ्यावर असताना, राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा दराने असा वाहतूक भत्ता व दैनिक भत्ता मिळण्यास हक्कदार असतील :

परंतु, मुंबई जिल्हा मंचाचे सदस्य वगळता, इतर जिल्हा मंचाचे सदस्य हे शासन वेळोवेळी निश्चित करील अशा दराने वाहतूक भत्ता मिळण्यास हक्कदार असतील.

(७) जिल्हा मंचाच्या बैठकींना उपस्थित राहण्याच्या प्रयोजनार्थ जिल्हा मंचाचे सदस्य, त्यांना शासकीय वाहन पुरविण्यात आले नसल्याचे प्रमाणपत्र त्यांनी सादर केल्यावर, खाली नमूद केलेल्या कमालमर्यादेस अधीन राहून, प्रत्यक्ष वाहतूक खर्च मिळण्यास हक्कदार असतील :—

(एक) मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्ह्यात प्रति दिन रुपये दोनशे.

(दोन) मुंबई महानगरपालिकेखेरीज इतर कोणत्याही महानगरपालिकेच्या स्थानिक सीमांमध्ये प्रति दिन रुपये शंभर ; आणि

(तीन) वरील खंड (एक) व (दोन) मध्ये नमूद केलेल्या क्षेत्राखेरीज राज्याच्या उर्वरित क्षेत्रामध्ये प्रति दिन रुपये पंचाहत्तर.

(८) जेव्हा लगतच्या जिल्हा मंचाचा अध्यक्ष किंवा सदस्य हे, जिल्हा मंचाच्या कामासाठी उपस्थित राहील तेव्हा, अशा अध्यक्षास किंवा यथास्थिती, सदस्यास शासन वेळोवेळी ठरवील असा वाहतूक भत्ता व दैनिक भत्ता देण्यात येईल.

१२. **राज्य आयोगाचा पूर्णवेळ अध्यक्ष व सदस्य यांचे वेतन/पारिश्रमिक—**(१) राज्य आयोगाच्या अध्यक्षास, राज्याच्या उच्च न्यायालयाच्या सेवारत न्यायाधीशाला अनुज्ञेय असेल असे वेतन, भत्ते व इतर वित्तलब्धी प्राप्त होईल.

(२) राज्य आयोगाच्या पूर्णवेळ सदस्यास, सर्व मिळून बासष्ट हजार रुपये इतके एकत्रित पारिश्रमिक देण्यात येईल.

(३) प्रतिनियुक्तीवर नियुक्त केलेले सेवारत शासकीय कर्मचारी, प्रतिनियुक्ती धारकांना लागू असलेल्या तरतुदीन्वये वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असतील.

(४) अध्यक्ष किंवा सदस्य पदावर पूर्णवेळ तत्त्वावर नियुक्त केलेल्या, शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तींची वेतन निश्चिती, निवृत्ती वेतनाची रक्कम वजात करून, आहरित करण्यात आलेल्या वेतनाच्या आधारे करण्यात येईल.

(५) (क) जर महाराष्ट्र शासनाच्या उप सचिव किंवा त्याच्या समकक्ष किंवा त्यापेक्षा उच्च पदावरून सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तींमधून पूर्णवेळ तत्त्वावर सदस्याची निवड करण्यात आली असेल तर त्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ यांच्या नियम १५७ च्या उप-नियम (२) अनुसार निश्चित केलेले वेतन मिळेल.

(ख) जर सदस्याची सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीशांमधून निवड करण्यात आली असेल तर, त्याचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ यांच्या नियम १५७ च्या उप-नियम (२) अनुसार निश्चित करण्यात यावे. सेवारत जिल्हा न्यायाधीश संवर्गातून नियुक्त करण्यात आलेल्या न्यायिक सदस्यांना, वेतन व भत्यांखेरीज प्रतिनियुक्ती भत्ता देखील देय असेल. सेवारत जिल्हा न्यायाधीश, प्रति महिना पंचाहत्तर लिटर इतका पेट्रोल मिळण्यास हक्कदार असेल.

(६) राज्य आयोगाचा अध्यक्ष व सदस्य हे शासकीय दौऱ्यावर असताना, राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा दराने वाहतूक भत्ता व दैनिक भत्ता मिळण्यास हक्कदार असतील.

(७) परिक्रम न्यायपीठांच्या बैठकींसह राज्य आयोगाच्या बैठकींना उपस्थित राहण्याच्या प्रयोजनार्थ, परिक्रम न्यायपीठाच्या सदस्यासह राज्य आयोगाचे सदस्य, त्यांना शासकीय वाहन पुरविण्यात आले नसल्याचे प्रमाणपत्र त्यांनी सादर केल्यावर, प्रति दिन रुपये दोनशे इतक्या कमाल मर्यादेस अधीन राहून, प्रत्यक्ष वाहतूक खर्च मिळण्यास हक्कदार असतील.

(८) वेतन, पारिश्रमिक व इतर भत्ते हे, राज्य शासनाच्या एकत्रित निधीमधून आणि संघ राज्यक्षेत्राच्या बाबतीत ते, भारताच्या एकत्रित निधीतून भागविण्यात येतील.

(९) जिल्हा मंचाचा व राज्य आयोगाचा अध्यक्ष व सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्ती यांमध्ये त्यांच्या पदावधी दरम्यान त्यांना नुकसानकारक ठरतील अशा रीतीने बदल करण्यात येणार नाहीत.

१३. **विवक्षित परिस्थितीत राज्य आयोगाचा आणि जिल्हा मंचाचा अध्यक्ष व सदस्य यांना पदावरून दूर करणे.—**(१) राज्य शासनास जर अध्यक्षाला किंवा कोणत्याही सदस्याला :-

(क) नादार म्हणून अभिनिर्णीत करण्यात आले असेल ; किंवा

(ख) अशा कोणत्याही अपराधाबद्दल त्याला दोषी ठरविण्यात आले असेल त्या अपराधाचा, राज्य शासनाच्या मते, ज्यात नैतिक अध:पतनाच्या अंतर्भाव आहे ; किंवा

(ग) अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून कार्य करण्यास शारीरिकदृष्ट्या किंवा मानसिकदृष्ट्या अक्षम ठरला असेल ; किंवा

(घ) त्याने, अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून त्याची कार्ये पार पाडण्यात बाधक परिणाम होण्याचा संभव आहे, अशाप्रकारचे आर्थिक व इतर हितसंबंध संपादित केलेले असतील ; किंवा

(ङ) त्याचे पदावर असणे त्याच्या पदाचा, लोकहिताला बाधक ठरेल अशाप्रकारे त्याने पदाच्या दुरुपयोग केला असेल ; किंवा

(च) त्याने परवानगी न घेता किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेर असलेली कारणे वगळता तो तीन लागोपाठच्या बैठकींना अनुपस्थित राहिला असेल तर,

अशा अध्यक्षाला किंवा कोणत्याही सदस्याला पदावरून दूर करता येईल.

(२) उप-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य आयोगाच्या अध्यक्षास, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीने नामनिर्देशीत केलेल्या, उच्च न्यायालयाच्या सेवारत न्यायाधीशाकडून चौकशी करण्यात आल्यानंतर त्या चौकशीमध्ये राज्य आयोगाच्या अध्यक्षास त्यांच्या विरुद्धच्या दोषारोपाबाबत कळविण्यात आलेले असेल आणि त्या दोषारोपांबाबत त्यांचे म्हणणे मांडण्याची त्याला वाजवी संधी देण्यात आलेली असेल, आणि तो दोषी असल्याचे दिसून आलेले असेल त्याखेरीज त्या उप-नियमाच्या खंड (घ), (ङ) आणि (च) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांवरुन त्यास पदावरुन दूर करता येणार नाही.

(३) उप-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य आयोगाच्या सदस्यास, जिल्हा मंचाच्या अध्यक्षास किंवा सदस्यास, राष्ट्रीय आयोगाच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेल्या राष्ट्रीय आयोगाच्या सदस्याकडून चौकशी करण्यात आल्यानंतर त्या चौकशीमध्ये जिल्हा मंचाच्या अध्यक्षास अथवा सदस्यास किंवा यथास्थिती राज्य आयोगाच्या सदस्यास त्याला दोषारोपाबाबत कळविण्यात आलेले असेल आणि त्या दोषारोपांबाबत त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आली असेल आणि तो दोषी असल्याचे दिसून आलेले असेल त्या खेरीज, त्या उप-नियमाच्या खंड (घ),(ङ) व (च) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणावरुन त्याला पदावरुन दूर करण्यात येणार नाही.

१४. **जिल्हा मंचाची कार्यपद्धती.—** (१) जिल्हा मंचाची भाषा ही मराठी असेल.

**स्पष्टीकरण.—**या उप-नियमाच्या प्रयोजनार्थ या भाषेमध्ये सुनावणीच्या व आदेशांच्या भाषेचा समावेश होतो.

(२) जिल्हा मंचासमोर तक्रार लेखी स्वरुपात करण्यात येईल आणि ती तक्रार जिल्हा मंचात दाखल करता येईल किंवा ती टपालाने पाठविता येईल. ती तक्रार व त्यासंबंधीची कागदपत्रे ती ३ प्रतीत असतील आणि जितके प्रतिवादी असतील तेवढया तक्रारीच्या व कागदपत्रांच्या प्रती त्यासोबत जोडलेल्या असतील. प्रबंधक, ती तक्रार प्राप्त झाल्यावर तिची छाननी करील आणि त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या नोंदवहीमध्ये ती फाईल करील.

(३) जिल्हा मंच हे प्राथमिक सुनावणी आवश्यक असल्यास, ती करण्यासह, कोणत्याही तक्रारीवर निर्णय देणारे एक प्राधिकरण असेल.

(४) प्रतिवादी त्याचे उत्तर व कागदपत्रे चार प्रतींत देईल.

(५) जिल्हा मंचाचे अध्यक्ष व सदस्य हे, प्रकरणे निकालात काढण्याकरिता जलदगतीने न्यायचौकशी करण्याचा आटोकाट प्रयत्न करतील.

(६) जिल्हा मंचाचा अध्यक्ष, न्यायनिर्णयाचे अंमलबजावणी पत्र प्राप्त झाल्यानंतर, ते आवश्यक त्या कार्यवाहीसाठी दिवाणी न्यायालयाकडे पाठवील.

(७) प्रबंधक, मंचाने केलेल्या कार्यालयीन कामकाजाबाबत आणि शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराबाबत मंचाच्या सदस्यांना माहिती देईल. मंचाकडील प्रकरणांबाबतच्या फाईली सदस्यांसमोर ठेवणे हे प्रबंधकाचे कर्तव्य असेल, जेणेकरुन सदस्यमंचाच्या कामकाजासाठी त्यांच्या वेळेचा सदुपयोग करु शकतील.

१५. **जिल्हा मंचाच्या बैठकीचे ठिकाण आणि त्यासंबंधित इतर बाबी.—**(१) जेथे राज्य शासन, एका जिल्हयापेक्षा अधिक जिल्हयांची अधिकारिता असणारा एक जिल्हा मंच घटित करण्याचा निर्णय घेईल, त्याबाबत जिल्हा मंचाचे कार्यालय त्या जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी स्थित असेल, ते अशाप्रकारे स्थापन केलेल्या जिल्हा मंचाचे ठिकाण व अधिकारिता अधिसूचित करील.

(२) जिल्हा मंचाच्या कामकाजाचे दिवस व कार्यालयीन तास हे राज्य शासनाचे कामकाजाचे दिवस व कार्यालयीन तास यांच्याप्रमाणे असतील.

(३) जिल्हा मंचाची अधिकृत मोहोर व चिन्ह हे, राज्य शासन, विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल.

(४) अध्यक्ष जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा तेव्हा जिल्हा मंचाची बैठक बोलावील.

(५) राज्य शासन, जिल्हा मंचाला त्याच्या दैनंदिन कामकाजात सहाय्य करण्यासाठी आणि या नियमांन्वये तरतूद केलेली किंवा अध्यक्षाने त्यांना नेमून दिलेली अशी इतर कार्ये पार पांडण्यासाठी आवश्यक असेल अशा कर्मचारी वर्गाची नियुक्ती करील.

(६) जेथे विरोधी पक्षकार (प्रतिवादी) तक्रारकर्त्याने केलेले दोषारोप कबूल करील त्याबाबतीत जिल्हा मंच त्या प्रकरणाच्या गुणावगुणांच्या आणि त्याला सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे तक्रारीवर निर्णय देईल.

(७) कलम १३ अन्वये करण्यात आलेल्या कार्यवाही दरम्यान, जर जिल्हा मंचाने पक्षकारांच्या सुनावणीचा दिनांक निश्‍चित केला असेल तर, तक्रारदाराने व विरोधी पक्षकाराने (प्रतिवादी) किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीने सुनावणीच्या अशा दिनांकास किंवा ज्या दिनांकापर्यंत सुनावणी पुढे ढकलली जाऊ शकेल अशा इतर कोणत्याही दिनांकास जिल्हा मंचासमोर उपस्थित राहणे बंधनकारक असेल. तक्रारदार किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी, अशा दिवशी जिल्हा मंचासमोर उपस्थित राहण्यात कसूर करील तर, जिल्हा मंचास, स्वेच्छाधिकारात एक तर कसुरीबद्दलीची तक्रार खारीज करता येईल किंवा तिच्या गुणावगुणंच्या आधारे निर्णय करता येईल. विरोधी पक्षकार (प्रतिवादी) किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी सुनावणीच्या दिवशी उपस्थिती राहण्यात कसूर करील तर जिल्हा मंचास त्या तक्रारीवर एकतर्फी निर्णय करता येईल.

(८) उप-नियम (७) खालील कार्यवाही करताना, जिल्हा मंचास कोणत्याही टप्प्यावर वाजवी कारणांवरुन त्या तक्रारीची सुनावणी स्थगित करता येईल. परंतु, सर्वसाधारणपणे एकापेक्षा जास्त वेळा अशी सुनावणी स्थगित करता येणार नाही आणि जेथे तक्रारीत मालाचे विश्लेषण किंवा चाचणी करणे आवश्यक नसेल तेथे शक्य तोवर विराधी पक्षकाराला (प्रतिवादी) नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत आणि जेथे मालाचे विश्लेषण किंवा चाचणी आवश्यक असेल तेथे, शक्य तोवर, एकशे पन्नास दिवसांच्या आत निर्णय दिला पाहिजे.

(९) जिल्हा मंचाच्या आदेशांवर खंडपीठामध्ये समाविष्ट केलेल्या जिल्हा मंचाच्या सदस्यांकडून स्वाक्षरी करण्यात येईल व त्यावर दिनांक टाकण्यात येईल आणि ते पक्षकारांना विनामूल्य कळविण्यात येतील.

(१०) जेव्हा जिल्हा मंचाचे सर्व सदस्य उपस्थित असतील त्यावेळी सुनावणी करण्यात येईल तेव्हा मंचाचा आदेश जे बहुमताने असेल ते देण्यात येईल.

१६. **मालाचे विश्लेषण आणि चाचणी करण्यासाठी जिल्हा मंचाने अनुसरावयाची कार्यपद्धती.—**(१) कलम-१३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये जिल्हा मंचास, आवश्यक वाटेल तर, त्यास घट्ट झाकण बसणाऱ्या स्वच्छ अशा पात्रामध्ये मालाचे एकापेक्षा अधिक नमुने पुरविण्याचा तक्रारदाराला निदेश देता येईल.

(२) मालाचे नमुने प्राप्त झाल्यावर, जिल्हा मंच त्या पात्रावर मोहोर लावील आणि पात्रावर पुढील माहिती असणाऱ्या खुणचिठ्ठया लावील.

(एक) ज्या प्रयोगशाळेकडे विश्लेषण व चाचणी करण्यासाठी नमुना पाठविण्यात येईल अशा समुचित प्रयोगशाळेचे नाव व पत्ता,

(दोन) जिल्हा मंचाचे नाव व पत्ता ;

(तीन) प्रकरण क्रमांक ;

(चार) जिल्हा मंचाची मोहोर.

(३) अभिकथित दोषाचे स्वरुप व अहवाल सादर करण्याचा दिनांक विनिर्दिष्ट करण्यात आल्यानंतर पंचेचाळीस दिवसांच्या आत किंवा जिल्हा मंचाकडून देण्यात येईल अशा वाढीव कालावधीच्या आत अहवाल देण्यासाठी, जिल्हा मंचाकडून तो नमुना समुचित प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येईल.

१७. **राज्य आयोगाच्या बैठकीचे ठिकाण व त्यासंबंधित इतर बाबी.**—(१) राज्य आयोगाचे कार्यालय मुंबई येथे स्थित असेल,

(२) राज्य आयोगाच्या कामकाजाचे दिवस व कार्यालयीन तास हे राज्य शासनाचे कामकाजाचे दिवस व कार्यालयीन तास यांच्या प्रमाणे असतील.

(३) राज्य आयोगाची अधिकृत मोहोर व चिन्ह हे, राज्यशासन विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल.

(४) अध्यक्ष जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा तेव्हा राज्य आयोगाची बैठक बोलावील.

(५) राज्य शासन, राज्य आयोगाला त्याच्या दैनंदिन कामकाजामध्ये सहाय करण्यासाठी आणि या नियमान्वये तरतूद केलेली किंवा अध्यक्षानें त्यांना नेमून दिलेली अशी इतर कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असेल अशा कर्मचारी वर्गाची नियुक्ती करील.

(६) विरोधी पक्षकार (प्रतिवादी) तक्रारकर्त्याने केलेले दोषारोप कबूल करील त्याबाबतीत, राज्य आयोग, प्रकरणाच्या गुणावगुणांच्या आधारे आणि त्याच्याकडे सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे तक्रारीवर निर्णय देईल.

(७) कलम १३ अन्वये करण्यात आलेल्या कार्यवाही दरम्यान राज्य आयोगाने पक्षकारांच्या सुनावणीचा दिनांक निश्चित केला असेल तर, तक्रारदाराने व विरोधी पक्षकाराने (प्रतिवादी) किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीने सुनावणीच्या अशा दिनांकास किंवा ज्या दिनांकापर्यंत सुनावणी पुढे ढकलली जाऊ शकेल अशा इतर कोणत्याही दिनांकास राज्य आयोगाच्या समोर उपस्थित राहण्यास बंधनकारक असेल. जेथे तक्रारदार किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी अशा दिवशी राज्य आयोगासमोर उपस्थित राहण्यास कसूर करील तर, राज्य आयोगास, त्याच्या स्वेच्छाधिकारात एकतर कसुरीबद्दलची तक्रार खारीज करता येईल किंवा तिच्या गुणावगुणानुसार निर्णय करता येईल. विरोधी पक्षकार (प्रतिवादी) किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी सुनावणीच्या दिवशी उपस्थित राहण्यात कसूर करील तर, राज्य आयोगास, तक्रारीवर एकतर्फी निर्णय करता येईल.

(८) उपनियम (७) खालील कार्यवाही करताना, राज्य आयोगास कोणत्याही टप्प्यावर त्याला योग्य वाटेल अशा अटींवर तक्रारीवरील सुनावणी स्थगित करता येईल.

परंतु, सर्वसाधारणपणे एकापेक्षा अधिक वेळा अशी सुनावणी स्थगित करता येणार नाही. आणि तक्रारीवर जेथे तक्रारीमध्ये मालाचे विश्लेषण किंवा चाचणी करण्याची आवश्यकता नसेल तेथे शक्य तोवर विरोधी पक्षकाराला (प्रतिवादीला) नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत आणि जेथे मालाचे विश्लेषण व चाचणी आवश्यक असेल तेथे शक्य तोवर एकशे पन्नास दिवसांच्या आत निर्णय दिला पाहिजे.

(९) राज्य आयोगाच्या आदेशांवर खंडपीठामध्ये समाविष्ट केलेल्या, राज्य आयोगाच्या सदस्यांकडून स्वाक्षरी करण्यात येईल व त्यावर दिनांक टाकण्यात येईल आणि ते पक्षकारांना विनामूल्य कळविण्यात येतील.

१८. **अपिलाच्या सुनावणीची कार्यपद्धती.—**(१ ) अपिलकर्त्याकडून किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीकडून ज्ञापन आयोगाला व्यक्तिशः किंवा आयोगाला उद्देशून नोंदणीकृत डाकेने सादर करण्यात येईल.

(२) उप नियम (१) अन्वये दाखल केलेले प्रत्येक अपिलअर्ज शक्यतो टंकलिखीत स्वरूपात वा सुवाच्च हस्ताक्षरात दाखल केले जाईल आणि कोणत्याही युक्तीवादाशिवाय किंवा कथनाशिवाय अपिलाची कारणे त्या सुस्पष्ट शीर्षांतर्गत संक्षिप्तपणे मांडण्यात येतील आणि अशा कारणांना लागोपाठचा क्रम लावण्यात येईल.

(३) प्रत्येक अपिलअर्जासोबत ज्याविरुद्ध अपिल करण्यात आले आहे अशा, जिल्हा मंचाच्या आदेशाच्या प्रमाणित प्रती आणि ज्ञापनामध्ये नमूद केलेल्या आक्षेपाच्या कारणांना पुष्टी देण्याकरिता आवश्यक असतील असे दस्तऐवज जोडण्यात येतील.

(४) अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतमर्यादेच्या समाप्तीनंतर अपिल सादर केलेले असेल तर, त्या मुदतमर्यादेच्या आत अपील दाखल न करण्यास अपिलकर्त्याकडे पुरेसे कारण होते, याबद्दल राज्य आयोगाची खात्री पटवण्याकरिता तो ज्या वस्तुस्थितीचा त्याने आधार घेतला असेल, ती वस्तुस्थिती मांडलेले शपथपत्र पुष्टीदाखल जोडलेल्या अपिलअर्जासोबत जोडण्यात येईल.

(५ ) अपिलकर्ता, कार्यालयीन प्रयोजनांसाठी राज्य आयोगाला अपिलअर्जाच्या चार प्रती सादर करील.

(६) पक्षकारांनी किंवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधींनी, सुनावणीच्या दिनांकास किंवा सुनावणी स्थगित केली असेल अशा इतर कोणत्याही दिनांकास राज्य आयोगासमोर उपस्थित राहणे त्यांना बंधनकारक असेल. जर अपिलकर्ता किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी अशा दिनांकास उपस्थित राहण्यास कसूर करील तर, राज्य आयोगास, स्वाधिकारे एकतर अपिल खारीज करता येईल किंवा प्रकरणाच्या गुणावगुणांवरून निर्णय देता येईल. जर प्रतिवादी किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी अशा दिनांकास उपस्थित राहण्यात कसूर करील तर, त्याबाबतीत राज्य आयोग, एकतर्फी कार्यवाही करील, आणि प्रकरणाच्या गुणावगुणांवरून ह्या अपिलावर एकतर्फी निर्णय करील.

(७) अपीलकर्त्यास, राज्य आयोगाची परवानगी घेतल्याखेरीज अपीलअर्जात नमूद केलेल्या हरकतींच्या कोणत्याही कारणाच्या पुष्ट्यर्थ प्रतिपादन करता येणार नाही किंवा त्याची सुनावणी करता येणार नाही. परंतु राज्य आयोग त्या अपिलावर निर्णय करताना, त्या अपीलअर्जात नमूद केलेल्या किंवा या नियमान्वये राज्य आयोगाची परवानगी घेतलेल्या हरकतींच्या कारणांवरच खिळून राहणार नाही :

परंतु ज्या कोणत्याही इतर कारणावरून एखाद्या पक्षकारावर बाधक परिणाम होईल, त्या पक्षकाराला, राज्य आयोगाकडून त्याचे म्हणणे मांडण्याची किमान एक संधी देण्यात आल्याखेरीज, आयोग अशा कोणत्याही कारणावर आधारित आपला निर्णय देणार नाही.

(८) राज्य आयोगास, त्याला योग्य वाटेल अशा अटींवर आणि कोणत्याही टप्प्यावर जर वाजवी कारण असेल तर त्या अपिलावरील सुनावणी स्थगित करता येईल. परंतु सर्वसाधारणपणे एकापेक्षा अधिक वेळा अशी सुनावणी स्थगित करता येणार नाही, आणि त्या अपिलावर शक्यतोवर, सुनावणीच्या पहिल्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत निर्णय करण्यात येईल.

(९) अपिलावरील राज्य आयोगाच्या आदेशांवर त्यामध्ये, राज्य आयोगाच्या न्यायपीठाच्या सदस्यांकडून दिनांकित स्वाक्षरी करण्यात येईल आणि ते पक्षकारांना विनामूल्य पुरविण्यात येतील.

१९. **निरसन आणि व्यावृत्ति.—** हे नियम अंमलात आल्यावर, महाराष्ट्र ग्राहक संरक्षक नियम, २००० आणि महाराष्ट्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाचा पूर्णवेळ अध्यक्ष व सदस्य, गट -अ (सेवाप्रवेश)नियम, २०११ हे, या नियमांव्दारे तरतूद केलेल्या बाबींशी जेथवर संबंधित असतील तेथवर, ते याव्दारे, निरसित करण्यात येत आहेत :

परंतु,—

(क) अशा निरसनामुळे, अशाप्रकारे निरसित केलेल्या नियामांन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेले आदेश किंवा केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही यांच्या पूर्वीच्या अंमलबजावणीस बाधा येणार नाही.

(ख) अशाप्रकारे निरसित केलेल्या नियमांखाली जी कार्यवाही या नियमांच्या प्रारंभास प्रलंबित होती अशी कोणतीही कार्यवाही जणूकाही ती या कार्यवाही या नियमांखालील कार्यवाही होती असे समजून, ती शक्यतोवर या नियमांच्या तरतुदीनुसार पुढे चालू ठेवण्यात येईल व निकाली काढण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**महेश पाठक,**
शासनाचे प्रधान सचिव.

**अनुसूची**

नियम ५ (७) (ग) पहा [redacted]

(१) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६

(२) वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९

(३) भारतीय मानक केंद्र अधिनियम, २०१६

(४) स्पर्धा अधिनियम, २००२

(५) अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६

(६) औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४५

(७) माल विक्री अधिनियम, १९३०

(८) स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६

(९) वीज अधिनियम, २००३

(१०) विमा अधिनियम, १९३८

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**महेश पाठक,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE,